
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ४३ | बुधवार,दि.१ ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर-प्रफुल्ल पटेल

**गोंदिया :–** लोकसभा व विधानसभा निवडणुका महायुती म्हणून लढवण्यात आल्या. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये थोडे वेगळी स्थिती असते. पक्षातील स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये याबाबत एक वेगळा उत्साह असतो.

या निवडणुकांमध्ये त्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची संधी असते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका स्वबळावर लढाव्यात असा सूर होता. त्याचीच दखल घेत पक्षाने स्वबळावर निवडणुका लढण्याच्या तयारीला लागण्याचा सूचना केल्या असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांनी सोमवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. ते दौऱ्यावर आले असता रामनगर निवासस्थानी संवाद साधला. यावेळी माजी आ. राजेंद्र जैन उपस्थित होते. खा. पटेल म्हणाले नागपूर येथे पक्षाचे चिंतन शिबिर पार पडले. यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका या स्वबळावर लढावाव्यात असा सूर आळवला.



### ओबीसी आरक्षणाला धक्का नाही

**मराठा समाजाला आरक्षण लागू करताना ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी सरकार घेत आहे. त्यामुळे यावरून कुणीही ओबीसींची दिशाभूल करू नये. तर काहीजण यावरून आपली पोळी भाजून घेत असून, अशा लोकांपासून सावध राहण्याचा सल्ला खा. प्रफुल्ल पटेल यांनी दिला.**

### अतिवृष्टीने चिंताजनक स्थिती

**अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या संकटग्रस्त परिस्थितीत केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने भरीव मदत करावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली. त्यांनीसुद्धा शेतकऱ्यांना भरीव मदत कशी करता येईल, याला प्राधान्य देणार असल्याचे सांगितल्याचे खा. प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.**

### शेतकऱ्यांना मदत करा

**अतिवृष्टीमुळे राज्यात चिंताजनक परिस्थिती आहे. बळीराजा संकटात आहे असून अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत. अशा स्थितीत सर्वांनी शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची गरज आहे. मेळावे, उत्स–वावर खर्च न करता संकटातील शेतकऱ्यांना मदत करावी, असे खा. पटेल यांनी सांगितले.**

## शेतकऱ्यांच्या अडचणी टाळण्यासाठी धान खरेदी केंद्रे लवकर सुरु करावे–आ.मुनगंटीवार



**चंद्रपूर :–** धान उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आधारभूत किंमत योजनेअंतर्गत धान खरेदी व नोंदणी केंद्रे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच सुरु करावीत, अशी मागणी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्न, ना–गरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे. या संदर्भात आ.मुनगंटीवार यांनी पत्र लिहून प्रश्न लवकर निकाली काढण्याची विनंती केली असून, लवकरच ते प्रत्यक्ष भेट घेऊनही पाठपुरावा करणार आहेत.

आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे की, चंद्रपूर जिल्ह्यात हलके धान ९० दिवसांत तर मध्यम धान १२० दिवसांत तयार होते. सिंचनसुविधा नसलेल्या शेतकऱ्यांकडून प्रामुख्याने या प्रकारचे उत्पादन घेतले जाते. मात्र, गेल्या वर्षी (सन २०२४–२५) धान खरेदी केंद्रे डिसेंबर महिन्यात सुरु झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना धान साठवून ठेवण्यास अडचण निर्माण झाली. परिणामी अनेकांना खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विकावे लागले, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे की, २०२५–२६ या वर्षात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये. त्यासाठी नोव्हेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यातच खरेदी केंद्रे सुरु करावीत. खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना नोंदणीसाठी आणि विक्रीसाठी सुलभ व पारदर्शक व्यवस्था ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा मोबदला आधारभूत किंमत (चडझ) नुसार त्वरीत अदा करण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री छगन भुजबळ यांना केली आहे.

## परतीच्या पावसाने ४७० हेक्टरवरील पिकांचे झाले नुकसान



**गोंदिया :–** जिल्ह्यात गेले तीन चार दिवस झालेल्या परतीच्या पावसाचा फटका खरीप हंगामातील धान पिकांना बसला. पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण कृषी विभागातर्फे सुरू आहे. प्राथमिक सर्वेक्षणात ९१ गावांतील ४७०.४० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले असून यामुळे ८७६ शेतकरी बाधित झाले आहे. हा केवळ प्राथमिक अंदाज असून यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पावसाळा संपायला आता जेमतेम दोनच दिवस उरले असूनही फक्त चारच तालुक्यांनी अपेक्षित सरासरी गाठल्याचे दिसून येत आहे. यामध्ये गोंदिया तालुक्यात १२४६.१ मिमी म्हणजेच १०४.२ टक्के, गोरेगाव तालुक्यात ११५३.१ मिमी म्हणजेच ११३.७ टक्के, देवरी तालुक्यात १३७५.१ मिमी म्हणजेच १०७.७ टक्के तर अर्जुनी–मोरगाव तालुक्यात १४५१.१ मिमी म्हणजेच सर्वाधिक १११.४ टक्के पाऊस बरसला आहे. उर्वरित चार तालुक्यांत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस बरसला आहे.

जिल्ह्यात खरिपात सर्वाधिक १ लाख ९६ हजार हेक्टरवर धानपिकाची लागवड करण्यात आली आहे. हलके धान निघण्याच्या मार्गावर असून पुढील महिन्यापासून धान कापणीला सुरुवात होणार आहे. तर जड धान निसविण्याच्या मार्गावर आहे. मात्र, याच दरम्यान सलग चार–पाच दिवस जोरदार पाऊस झाल्याने धानपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचा तोंडचा घास

हिरावला असून शेतकऱ्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे कृषी विभागाच्या यंत्रणेच्या माध्यमातून सुरू आहेत. कृषी विभागाच्या प्राथमिक सर्वेक्षणात ९१ गावांतील ४७०.४० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून ८७६ शेतकरी बाधित झाले आहे. नुकसानीच्या आकड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अंतिम अहवाल तयार करून तो जिल्हा प्रशासनाकडे नुकसान भरपाईसाठी पाठविण्यात येणार आहे.

**सर्वाधिक नुकसान तिरोडा तालुक्यात**

पावसामुळे सर्वाधिक २७० हेक्टरमधील पिकांचे नुकसान तिरोडा तालुक्यात झाले आहे. तर त्या खालोखाल गोरेगाव व गोंदिया तालुक्यातील धान पिकांचे नुकसान झाले आहे.


जिल्ह्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका केवळ पिकांनाच नव्हे तर रस्त्यांनासुद्धा बसला आहे. अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील १६८ रस्त्यांवरील डांबर पूर्णपणे वाहून गेल्याची बाब पुढे आली आहे. यामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ३४ कोटी १० लाखांचा निधी लागणार असल्याचा अहवाल जि.प.ने शासनाला पाठविला आहे.यंदाच्या पावसाळ्यात ग्रामीण भागातील रस्त्यावर असलेले १३ पूल व तीन नाली वाहून गेल्याने त्या नवीन तयार करण्याची गरज असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे पाठविलेल्या अहवालात म्हटले आहे. खड्डे बुजविण्यावर लाखो रुपये खर्च केले जातात; मात्र समस्या जशीच्या तशीच राहते. त्यामुळे हा खर्च पाण्यात गेल्याचे चित्र आहे.

## 'टीईटी'च्या बंधनाला तीव्र विरोध;४ ऑक्टोबरला राज्यभर आंदोलन

**गोंदिया:–** शिक्षक पात्रता परीक्षेबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याच्या मागणीसाठी संपूर्ण राज्यातील शिक्षक आंदोलन करणार आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात येत्या शनिवारी, ४ ऑक्टोबर रोजी शिक्षकांचे मोर्चे काढले जाणार आहेत.

देशातील शासकीय आणि खासगी शाळांमधील ५३ वर्षांपर्यंतच्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. पहिली ते आठवी या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे देशभरातील शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने २३ ऑगस्ट २०१० रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून इयत्ता पहिली ते आठवीला शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी टीईटी लागू केली. महाराष्ट्र शासनाने २३ ऑगस्ट २०१३ रोजी शासन निर्णय काढून २०१३नंतर से–वेत येणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना टीईटी अनिवार्य केली आहे. मात्र, या अंजुमन इशात–ए–तालीम अल्पसंख्याक शिक्षणसंस्थेच्या अपिलावर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, शासकीय प्राथमिक शाळा, अनुदानित–विनाअनुदानित शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य असल्याचा निर्णय दिला. त्यानुसार, १ सप्टेंबर २०२५ रोजी ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षांपेक्षा कमी शिल्लक आहे, त्यांना टीईटीमधून सूट दिली आहे. मात्र, पदोन्नती घ्यायची असल्यास टीईटी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षांपेक्षा कमी आहे, त्या प्रत्येक शिक्षकाला १ सप्टेंबर, २०२७पूर्वी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे. अन्यथा, स्वेच्छेने राजीनामा किंवा सेवामुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



या निर्णयाचा शिक्षक विरोध करीत आहेत. महाराष्ट्रात नियुक्त झालेल्या शिक्षकांनी सेवेत येण्याच्या नियमानुसार आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण केली आहे. तसेच ज्या वेळेस शिक्षक म्हणून नोकरीत आले, त्यावेळी आवश्यक असणाऱ्या स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. शासनाच्या विधिज्ञांनी कदाचित न्यायालयासमोर स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय शाळांतील शिक्षकांनी अर्हता पूर्ण केली असल्याची बाब मांडली नसावी. तसेच शिक्षकांना न्यायालयासमोर बाजू मांडण्याची संधी सुद्धा मिळाली नाही. त्यामुळे अशाप्रकारचा निर्णय आला असा–वा. न्यायालयाच्या एका निर्णयामुळे १२ ते ३३ वर्षांपेक्षा अधिक सेवा झालेल्या राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे जीवन उद्ध्वस्त होण्याची स्थिती निर्माण झाली आहे, असे शिक्षकांचे म्हणणे आहे.

शिक्षकांनी वेळोवेळी आवश्यक असणारी पात्रता धारण केली असल्याने राज्य शासनाने शिक्षकांच्या बाजूने उभे राह–वे. शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी अथवा शिक्षकांच्या संरक्षणासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी शिक्षक करीत आहेत. याच मागणीसाठी राज्यातील शिक्षक संघटनांनी शनिवारी, ४ ऑक्टोबर रोजी प्रत्येक जिल्ह्यात मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

**या संघटना होणार सहभागी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, प्राथमिक शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील), पुरोगामी शिक्षक संघटना, अखिल महाराष्ट्र शिक्षक संघ, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक परिषद, केंद्र प्रमुख व पदवीधर शिक्षक संघटना, शिक्षक सेना, अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, जुनी पेन्शन हक्क संघटना, शिक्षक भारती, आदर्श शिक्षक समिती, न. पा. व म. न. पा. शिक्षक संघ, बहुजन शिक्षक महासंघ, प्रहार शिक्षक संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, महाराष्ट्र जि.प. मागासवर्गीय शिक्षक संघटना, आस शिक्षक संघटना, स्वराज्य शिक्षक संघटना, सहकार शिक्षक संघटना, पंजाबराव देशमुख शिक्षक महासंघ, इब्टा शिक्षक संघटना, एकल शिक्षक सेवा मंच, आदिवासी शिक्षक संघटना, स्वाभिमानी शिक्षक संघटना, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संघ अशा विविध शिक्षक संघटनांचा मोर्चात सहभाग राहणार आहे.

## बाजार समिती सभापती दीड लाखाची लाच घेतांना जाळ्यात

**गोंदिया :–** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये स्थायी कर्मचारी नियुक्ती आदेश काढण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच घेणारे सभापती व कनिष्ठ लिपिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले. ही कारवाई लगतच्या ग्राम मुर्री येथे सोमवारी भंडारा येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केली आहे. सभापती भाऊराव रामाजी उके (वय ६७, रा. गोंदिया) व कनिष्ठ लिपिक हेमेंद्र ऊर्फ सोनू चुन्नीलाल पटले (३७, रा. गोंदिया) अशी आरोपींची नावे आहेत.




सविस्तर असे की, सभापती भाऊराव उके व कनिष्ठ लिपिक हेमेंद्र पटले यांनी तक्रारदारास बाजार समितीमध्ये स्थायी कर्मचारी म्हणून नियुक्ती देणे व तशी ऑर्डर काढण्याकरिता अडीच लाख रुपयांची मागणी केली होती. यावर तक्रारदाराने भंडारा येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार दिली. शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने पथकाने १९ सप्टेंबर रोजी पडताळणी केली असता पंचासमक्ष भाऊराव उके व हेमेंद्र पटले यांनी तक्रारदारास तडजोडीअंती दीड लाख रुपये लाच रक्कम स्वतःकरिता मागितल्याचे निष्पन्न झाले.

या आधारे पथकाने सोमवारी (दि. २९)शहर पोलीस ठाणे परिसरातील मुर्री परिसरात सापळा कारवाई दरम्यान सभापती उके यांच्या निर्देशावरुन कर्मचारी हेमेंद्र पटले याला तक्रारदाराकडून दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

ही कारवाई पोलिस उपअधीक्षक डॉ. अरुण लोहार, पोलिस निरीक्षक नितेश देशमुख, मपोनि उज्ज्वला मडावी, पोउपनि संजय कुंजरकर, शिपाई प्रतीक उके, चेतन पोटे, मयूर सिंगणजुडे, विष्णू वरठी, हितेश हलमारे, हिरा लांडगे, राजकुमार लेंडे, चालक शिपाई पंकज सरोते यांनी पार पाडली.

## सार्व.दुर्गाउत्सव मंडपात ठाकरे गट शिवसेना जिल्हाप्रमुखाची राकाँ शहर अध्यक्षाला मारहाण



**गोंदिया:** नवरात्र उत्सव शांततापूर्ण साजरा होत असताना गोंदिया जिल्हा शिवसेना (उबाठा) प्रमुख आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे शहर अध्यक्ष यांच्यात मामा चौकातील सार्वजनिक दुर्गा मंदिर मंडपात प्रवेश करण्यावरून राडा झाल्याची घटना २९ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली. जिल्हा शिवसेना (उबाठा) प्रमुख, माजी नगरसेवक पंकज यादव हे पत्नी व माजी नगरसेविका ललिता यादव यांच्यासह सार्वजनिक मंडळात दुर्गा मातेचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. मंडपात प्रवेश करीत असताना त्यांना हवनकुंड निर्माण करण्याचे कार्य सुरू असल्याचे कारण सांगून मूर्तीपर्यंत जाण्यास अडवण्यात आले.त्यांनी अडवणाऱ्याच्या श्रीमुखात हाणली. हे पाहून मामा चौक दुर्गा उत्सव समितीचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे शहर अध्यक्ष नानू मुदलियार यांनी या वादात मध्यस्थी करीत मंडपात हवन कुंड निर्माण कार्य सुरू असल्यामुळे कुणालाही मंडपाच्या आत प्रवेश करण्यापासून काही वेळेपर्यंत मनाई करण्यात आल्याचे सांगितले.

त्यानंतर शिवसेना जिल्हाप्रमुख पंकज यादव यांनी मुदलियारला मारहाण करीत त्यांच्या समर्थकांनी खुर्ची उचलून त्यांच्या अंगावर फेकली.दरम्यान मामा चौक सार्वजनिक दुर्गा उत्सव समितीच्या इतर सदस्यांनी वेळीच धाव घेत दोघांना शांत केले.

पण या सर्व घडलेल्या मारहाण आणि राड्याचे चित्रीकरण मंडपातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात टिपले गेले.राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्षांनी पोलिसात पंकज यादव आणि त्यांच्या पत्नी ललिता यादव यांच्या विरोधात तक्रार दिल्यामुळे यादव दांपत्य आणि त्यांचे पाच–सहा समर्थक यांच्याविरुद्ध गोंदिया शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती गोंदिया शहर पोलीस निरीक्षक किशोर पर्वते यांनी दिली आहे.

## मुख्याधिकाऱ्यांची खुर्ची अन् संगणक केले जप्त

### न्यायालयाच्या आदेशावरून कारवाई : जिल्हा क्रीडा संकुल जमीन मोबदला प्रकरण

**गोंदिया :–** जिल्हा क्रीडा संकुलसाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला नगर परिषदेने थकविला आहे. परिणामी न्यायालयाच्या आदेशावरून जमिनीच्या तत्कालीन मालकांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांची खुर्ची तसेच कार्यालयातील तीन संगणक संच जप्त केले. ही कारवाई सोमवारी (दि.२९) करण्यात आली आहे.

सविस्तर असे की, शहरा–तील छोटा गोंदिया परिसरातील रहिवासी संतोष ढेकलप्रसाद पटले यांची तीन एकर जमीन जिल्हा क्रीडा संकुलासाठी नगर परिषदेने अधिग्रहीत केली आहे. यासाठी सन २०११–१२ मध्ये त्यांना २४ लाख ८२ हजार रुपये जमिनीचा मोबदला म्हणून देण्यात आले. मात्र, जमिनीची किमत कमी आखण्यात आल्याने पटले यांनी न्यायालयात धाव घेतली. यावर न्यायालयाने सन २०१७–१८ मध्ये पटले यांना आणखी ३६ लाख ३४ हजार रुपये मोबदला स्वरूपात देण्याचे आदेश नगर परिषदेला दिले आहे. मात्र, नगर परिषदेने रक्कम दिली नाही. अशात पटले यांना न्यायालयाने जप्ती आदेश दिले व त्यानुसार त्यांनी सोमवारी (दि.२९) न.प. मुख्याधिकाऱ्यांचे कार्यालय गाठले.

यावर मुख्याधिकारी संदीप बोरकर यांनी आदेशानुसार कारवाई करा असे सांगत निघून गेल्याची माहिती मिळाली. यानंतर न्यायालयाचे बेलिफ आर. डी. सुखदेवे व त्यांचे सहकारी धर्मेश ढोबळे यांनी कारवाई सुरू केली व मुख्याधिकाऱ्यांची खुर्ची व त्यांच्या दालनातील सहा अन्य खुर्चा तसेच तीन संगणक संच जप्तीची कारवाई केली.



### १५ दिवसांपूर्वी दिले पैसे

**न्यायालयाच्या आदेशानुसार पटले यांना नगर परिषदेकडून ३६ लाख ३४ हजार रुपये घ्यायचे आहेत. मात्र, नगर परिषद पैसे देत नसल्याने न्यायालयाने त्यांना जप्तीचे आदेश दिले आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर १५ दिवसांपूर्वी नगर परिषदेने त्यांना तीन लाख रुपये मात्र अजूनही ३३ लाख ३४ हजार रुपये घेणे निघत आहे. अशातच सोमवारी (दि.२९) जप्तीची कारवाई करण्यात आली**

### दोन लाखांचा विषय रेंगाळला

**फिर्यादी संतोष पटले व त्यांचे धाकटे भाऊ किशोर पटले हे बेलिफसोबत नगर परिषद कार्यालयात गेले असता त्यांच्यासोबत कोर्ट एजंट राजेश सव्वालाखे यांनी दोन लाख रुपये देतो कारवाई थांबवा अशी बोलणी केली. यावर पटले यांनी त्यांना न्यायालयात जाऊन प्रक्रिया करून घेण्यास सांगितले. त्यानुसार, सव्वालाखे न्यायालयातही गेले होते. तर पटले यांनी त्यांना यासाठी बराच वेळही दिला. मात्र, याचा काहीच फायदा झाला नाही व शेवटी जप्तीची कारवाई करावीच लागली.**

## सीईओचा दणका,तांडाटोला व रतनारा शाळेचे तीन शिक्षक निलबिंत

**गोंदिया:–** जिल्हा परिषदेच्या शांळामध्ये शिक्षक उशिरा येत असल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम यांनी शाळा सुरु होण्याच्या वेळेआधीच आकस्मिक भेट देण्यास सुरवात केली.त्यातच २६ सप्टेंबरला गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या तांडाटोला येथील शाळेला भेट देत वेळेवर शाळेत हजर न झालेल्या मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षिकेला निलबिंत केल्याने शिक्षक वर्गात चांगलीच खळबळ माजली आहे.निलबिंत करण्यात आलेल्या मध्ये यु.यु.उके,प्रभारी मुख्याध्यापक व श्रीमती कौशल्या लिखन कटरे, सहाय्यक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,तांडाटोला पंचायत समिती,गोंदिया यांचा समावेश आहे. तर जिल्हा परिषद पीएमश्री शाळा रतनारा येथील मुख्याध्यापक ना–गपूरे यांनी कार्यालयीन कामात केलेल्या गैरकारामुळे शिस्तभंग कलमातंर्गत निलबिंत करण्यात आले आहे..



सविस्तर असे की, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम यांनी (दि.२६)सकाळी १०.३० वाजता आकस्मिक भेट दिली असता सदर शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक यु.यु.उके व सहाय्यक शिक्षिका कौशल्या कटरे हे अनाधिकृत गैरहजर असल्याचे दिसून आले.तसेच त्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचा अर्ज सादर न केल्याचे दिसुन आल्याने आपल्या पदाच्या कर्तव्यात कसूर केल्याचे कारण देत जिल्हा परिषद सेवा नियमांचा भंग केल्याने शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरत असल्याने तात्काळ प्रभावाने निलंबीत करण्यात आल्याचे आदेश काढण्यात आले आहे.

निलबिंत काळात यु.यु.उके यांना पंचायत समिती अर्जुनी मोरगाव तर श्रीमती कौशल्या कटरे यांना पंचायत समिती गोरेगाव येथे हलविण्यात आले आहे.

साप्ताहिक
# बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक 

## संपादकीय

### अवकाळी पावसाने मोडले महाराष्ट्राचे कंबरडे

महाराष्ट्रातील मराठवाडा विशेषतः सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांसह विदर्भातील काही जिल्ह्यात सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात अवकाळी पावसाने दहशत माजवली. २३ सप्टेंबरपासून सुरु झालेल्या मुसळधार पावसाने शेती, जनजीवन आणि पायाभूत सुविधा यांचा विचका केला. हवामान विभागाने २३ ते २९ सप्टेंबर या कालावधीत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिला होता. परतीच्या पावसाच्या रूपात आलेल्या या अवकाळीने शेतकऱ्यांच्या टाळूवर हात ठेवला असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या आठवड्यातील घडामोडी आणि त्यांचे परिणाम यांचा आढावा घेताना, हा पाऊस केवळ नैसर्गिक संकट नसून, हवामान बदलाचा जागतिक प्रभाव स्थानिक पातळीवर खोलवर दाखवतो आहे.

२३ तारखेपासून परिस्थिती गंभीर झाली. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राने पश्चिमेकडे सरकत महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर आणि मैदानी भागात मुसळधार पाऊस झाला.अतिवृष्टीमुळे धान, कापूस, सोयाबीन, कांदा, द्राक्ष आणि मका, मूग, उडीद, बाजरी, मटकीसारख्या खरीप आणि कडधान्य पिकांचे मोठे नुकसान झाले.

परतीच्या पावसाने दणका देण्याचं हे काही पहिलं वर्ष नाही. यापूर्वी आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेशच्या पूर्व भागात परतीच्या पावसाने महापूर यायचे. गावं जलमय व्हायची. पण, या वर्षीचं चित्र अगदी वेगळं आहे. जम्मू–काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशाबरोबरच गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब या राज्यांतही परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. देशाचं धान्याचं कोठार म्हणून जी राज्यं गणली जातात, त्या पंजाब, हरियाणात झालेली अतिवृष्टी आणि आलेले पूर देशाला अन्नधान्याच्या बाबतीत मोठा फटका दिल्याशिवाय राहणार नाहीत. अन्यत्र झालेल्या अतिवृष्टीनेही डाळी, कडधान्य, सोयाबीन, कापसाच्या पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. देशाचा शेती उत्पादनाचा मूळ हिशोबच यावर्षी पूर्ण बिघडून जाणार आहे. हे नुकसान नक्कीच कमी नसेल.

ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, दिवाळीनंतर याबाबतचे अंदाज समोर येतील. बदललेल्या निसर्गचक्राने भारतीय शेतीचं; आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेचं किती नुकसान केलं आहे, ते त्यावेळी कळेल. पूर्वी वारावादळं होत नव्हती, ढगफुटी होत नव्हत्या असं नाही. त्याचं प्रमाण अपवादात्मक असे. आता ते सर्रास होऊ लागलं आहे. मान्सूनचं वेळेपूर्वी आगमन, कमी वेळात अचानक जास्त कोसळणं आणि त्यानंतर मुक्काम लांबवणं या पूर्ण चक्राचाच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. हे बदललेलं चक्र शेती आणि शेतकऱ्याच्या मुळावर आलंच आहे. पण, देशाच्या पायाभूत सुविधा यंत्रणांवरही त्याचा परिणाम होतो आहे.

रेल्वे, रस्ते इमारती, मोठे पूल, वीज वाहिन्यांचं जाळं, दूरसंचार नेटवर्क हा पाऊस उद्ध्वस्त करतो आहे. शेती आणि पर्यावरणीय नुकसानीला याची जोड दिली, तर बदललेल्या पाऊसमानाचा आपल्या अर्थव्यवस्थेला किती मोठा फटका बसतो आहे, हे लक्षात येईल. अशा नुकसानीचा विचार करताना कधीच मानवी भावभावना, आकांक्षा, स्वप्नं, नातेसंबंधावर कसं पाणी फिरतं, याची मोजदाद होऊ शकत नाही. ती करता आली, तर हे नुकसान मोजण्याच्या पलीकडचं असेल! या सगळ्या प्रतिपादनाचा मथितार्थ एवढाच, की पावसाचा हा बदललेला स्वभाव पाहून त्यानुसार आपल्याला तातडीने उपाययोजना कराव्या लागतील. कृषी शास्त्रज्ञांवर याची सर्वात मोठी जबाबदारी असेल. जोडीला हवामानशास्त्रज्ञ, अभियंते, नगर रचनाकार आणि व्यवस्थापन तज्ज्ञांची जोडही लागेलच. अचानक येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यांचा निचरा होण्यासाठी काँक्रिटीकरणाच्या वेडाला आवर घालणं, जुन्या ओढ्या–नाल्यांना पुनरुज्जिवीत करणं, नद्यांभोवतीची अतिक्रमणं दूर करणं, नद्यांची पात्र रुंद आणि खोल करणं, तलाव–धरणातले गाळ काढणं या उपाययोजना प्राधान्यक्रमाने आणि कठोरपणे अमलात आणाव्या लागतील. अन्यथा, दरवर्षी संपत्तीची, मानवी कर्तृत्वाची मोठी हानी होत राहील.

भविष्यातील आव्हान हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत अनिश्चितता वाढली आहे. गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, पूर आणि दुष्काळ यांची वारंवारिता वाढली आहे. सांगली, सातारा आणि कोल्हापूरसारख्या शेतीप्रधान भागांना हवामानस्नेही शेती पद्धती, सुधारित धरण व्यवस्थापन आणि अचूक हवामान अंदाज यांची गरज आहे. पीक विमा योजना अधिक प्रभावी करणे, जलसंधारण प्रकल्प राबवणे आणि शेतकऱ्यांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर पाण्याचा निचरा आणि पूर नियंत्रणासाठी पायाभूत सुविधा बळकट कराव्या लागतील. पण, यासाठी जागृतपणे धोरणे अमलात येण्यासाठी नेत्यांचा सर्वपक्षीय दबावगट देखील कार्यरत करावा लागेल. महापूर, दुष्काळ आणि अवकाळी हे तिसरे आव्हान बनत आहे. त्याला सामोरे जाण्यासाठी तितकी जागृती नव्याने निर्माण करावी लागेल.

# ओबीसी आरक्षणाचा प्रवास!

### स्वातंत्र्यपूर्व भारतात ओबीसी आरक्षणाची स्थिती काय होती?
### स्वातंत्र्यानंतर या संदर्भात कशी आणि काय पावलं उचलली गेली?
### मंडल आयोगानं यात नेमकी काय भूमिका बजावली?
### ५२ टक्के आरक्षण लागू होण्याची पार्श्वभूमी काय होती?

**खेमेंद्र कटरे**

मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावं, या मागणीवरुन अवघ्या महाराष्ट्राचं वातावरण आठवडाभरापासून तापलेलं आहे. आंदोलनांमधून मराठा समाजबांधव आपली मागणी रेटून धरत आहेत. हे घडत असतानाच दुसरीकडं ओबीसी आरक्षणातून मराठ्यांची मागणी पूर्ण करता येणं शक्य असल्याचा आवाज वाढला. यामुळं ओबीसींमधून मराठ्यांना आरक्षण नकोच, असा सूर उमटू लागला आहे. निवेदनांच्या माध्यमातून सुरु झालेला हा लढा आता रस्त्यावर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या वादात ओबीसी आरक्षणाचा नेमका प्रवास कसा आहे, मराठ्यांना समाविष्ट करण्यास ओबीसी का विरोध करत आहेत; हे जाणून घेणं महत्वाचं ठरतं.

**स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची आरक्षणाची गणितं**

ओबीसींच्या आरक्षण प्रवास उलगडताना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सरचिटणीस सचिन राजूरकर सांगतात, देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांच्या राजवटीत १८७१ ते १९३१ दरम्यान दर दहा वर्षांनी ओबीसींची जनगणना करण्यात येत होती. या आधारावर देशात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ५२ टक्के ओबीसी होते. ओबीसी समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये फार मागासलेला होता. ओबीसी, एससी, एसटी या सर्व बहुजनांना आरक्षण देण्यात याव, अशी मागणी महात्मा ज्योतिबा फुले यांनी ब्रिटिश सरकारसमोर १८८२ मध्ये केली. कोल्हापूर संस्थानात १९०२ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या शासनकाळात ओबीसी वर्गाला ५० टक्के आरक्षण देण्यात आलं होतं. याचा विशेष उल्लेख महात्मा फुल्यांनी "शेतकऱ्यांचा आसूड' या आपल्या ग्रंथात केला आहे. सामाजिक न्याय आणि सामाजिक समता या भावनेतून दिलेलं आरक्षण स्वातंत्र्यापर्यंत मिळत होतं. स्वातंत्र्यानंतर घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तत्कालीन कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या परिश्रमानं राज्यघटनेतल्या कलम ३४० नुसार ओबीसी प्रवर्गाला आरक्षण दिलं गेलं. घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार अनुसूचित जाती (एससी) आणि कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातीच्या (एसटी) प्रवर्गाला आरक्षण देण्याचं नमूद करण्यात आलं. अनुसूचित जाती प्रवर्गाची पूर्ण जातीनिहाय सूची तयार असल्यामुळं सोबत "शेड्युल' (अनुसूची) जोडली गेली. ती म्हणजे अनुसूची १. सोबतच अनुसूचित जमातीची जातनिहाय पूर्ण सूची तयार असल्यामुळं त्यांची सूचीही सोबत जोडली गेली. ती म्हणजे अनुसूची २. ओबीसी संवर्गात समाविष्ट असणाऱ्या संपूर्ण जातींची यादी तयार नव्हती; त्यामुळं ओबीसींची सूची तयार होऊ शकली नाही. परिणामी घटनेच्या ३४० व्या कलमाची अंमलबजावणी करण्यासाठी पहिल्या लोकसभेत आयोग स्थापन करुन ओबीसींच्या सर्व जातींची सूची तयार करण्याची शिफारस करण्यात आली. अनुसूचित जाती आणि जमातींची सूची तयार असल्यामुळं या दोन प्रवर्गांना स्वतंत्र भारतात अनुक्रमे पंधरा टक्के आणि साडेसात टक्के आरक्षण शिक्षण आणि नोकरीमध्ये लागू करण्यात आलं. ओबीसी संवर्गातल्या जातींची यादी तयार नसल्यामुळं ओबीसींना हे आरक्षण मिळालं नाही.

**मद्रास प्रांतात आजही ओबीसींना ५० टक्के आरक्षण**




मद्रास प्रांतात १९२१ पासून सुरू असलेलं मागासवर्गीय आरक्षण १९५० मध्ये राज्यघटना अंमलात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार रद्द करण्यात आलं. ओबीसी नेते पेरियार रामास्वामींनी याविरुद्ध मद्रास प्रांतात तीव्र आंदोलन केलं. त्याचा परिणाम म्हणून पहिल्यांदा घटनेमध्ये आरक्षणाची नोंद करण्यात आली. त्याचं फलित असं, की तमिळनाडूत ओबीसींना ५० टक्के आरक्षण आजही कायम आहे.

**ओबीसींसाठी बाबासाहेबांचा मंत्रिपदाचा त्याग**

राज्यघटनेच्या ३४० व्या कलमानुसार ओबीसींना आरक्षणाच्या सुविधा लागू करण्याच्या हेतूनं आयोग स्थापन करण्याची शिफारस करुनही असा आयोग स्थापन करण्यात आला नाही. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासह अन्य नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांकडं तत्कालीन सरकारनं दुर्लक्ष केल्यामुळं दुःखी होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला. बाबासाहेबांच्या या कृतीला घाबरुन सरकारनं २९ जानेवारी १९५३ ला खासदार काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी आयोगाची स्थापना केली. या आयोगाचा अहवाल ३० मार्च १९५५ रोजी राष्ट्रपतींना सादर करण्यात आला. या अहवालात ओबीसींना शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, पदोन्नतीमध्ये आरक्षणाची शिफारस केली गेली. अध्यक्षांनी मात्र आयोगानं तयार केलेल्या अहवालाशी आपली व्यक्तिगत सहमती नसल्याचं पत्र राष्ट्रपतींना दिलं. नंतर तब्बल २५ वर्षापर्यंत हा अहवाल लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आलाच नाही.

**मंडल आयोगाची स्थापना**

१९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांचं सरकार सत्तेत आलं. ओबीसी नेत्यांनी पुन्हा कालेलकर आयोगाचा मुद्दा उपस्थित केला. या सरकारनं कोणतीही चर्चा न करता कालेलकर आयोगाचा अहवाल रद्द करुन २० सप्टेंबर १९७८ रोजी खासदार बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नवीन आयोग स्थापन केला. या आयोगानंही दोन वर्ष अभ्यास करुन ३१ डिसेंबर १९८० रोजी आपला अभ्यासपूर्ण अहवाल राष्ट्रपतींकडं सादर केला. या अहवालानं कालेलकर आयोगाच्या शिफारशींवर शिक्कामोर्तब केलं. नंतर हा अहवालही दहा वर्ष लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आला नाही. तो मंजूरही करण्यात आला नाही. परिणामी ओबीसी प्रवर्गाला त्यांच्या घटनात्मक अधिकारापासून दूर ठेवलं गेलं. डिसेंबर १९८९ मध्ये पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या सरकारमध्ये मंडल आयोगाचा अहवाल मान्य करण्याची मागणी होऊ लागली. व्ही. पी. सिंग यांनी अहवालाच्या शिफारशी वाचल्यानंतर त्याबद्दल सहमती दर्शवली. शेवटी ७ ऑगस्ट १९९० रोजी लोकसभेनं मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यास मंजुरी दिली. या कारणामुळेच व्ही. पी. सिंग एकमात्र बहुजन पंतप्रधान म्हणून नावारुपाला आले.

**आणि लागू झालं ५२ टक्के आरक्षण**

तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या बहुजनवादी भूमिकेमुळं आणि मंडल आयोगाच्या शिफारशींना घाबरुन आरक्षणविरोधातल काही लोक ७ ऑगस्ट १९९० रोजी सर्वोच्च न्यायालयात गेले. शेवटी १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आरक्षणाची कमाल मर्यादा ५० टक्के करण्यात आली आणि उत्पन्न मर्यादेच्या अटी घालण्यात आल्या. या निर्णयामुळं एकूण ५० टक्के आरक्षणापैकी पूर्वीपासून सुरू असलेलं अनुसूचित जातींचं १५ टक्के आणि अनुसूचित जमातींचं ७.५ टक्के असं एकूण २२.५ टक्के आरक्षण वजा केल्यानंतर शिल्लक २७.५ टक्क्यांपैकी २७ टक्के आरक्षण १९९२ मध्ये ओबीसींना लागू करण्यात आलं. त्यासोबतच "क्रिमिलेअर'ची अट घालण्यात आली. जी सुविधा ओबीसींना १९५२ मध्येच मिळायला हवी होती; त्या अधिकारापासून ओबीसींना ४० वर्ष वंचित ठेवलं गेलं. आणि नंतरही; एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के वर्गाला नाममात्र २७ टक्के आरक्षण लागू झालं. केंद्रात ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय नाही, १०० टक्के दिली जाणारी शिष्यवृत्ती पाच वर्षानंतर कमी करुन ५० टक्के करण्यात आली. आजपर्यंत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी एकही वसतिगृह निर्माण केलं गेलेलं नाही. ओबीसी मागासवर्गीय असूनही अॅट्रासिटी कायद्यात त्यांचा समावेश केला गेला नाही. शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन नाही. देशाच्या स्वांतत्र्यानंतरही आजच्या एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के ओबीसी समाजावर हा अन्याय आहे. या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या घटनात्मक मागण्यांकडं राज्य आणि केंद्र शासनाचं लक्ष वेधून त्या पूर्ण करुन घेण्यासाठी ओबीसी समाजाचा लढा आजही सुरू आहे.

## चुलोदपासून आमदार आपल्या दारी जनसंवाद अभियानाची सुरुवात



**गोंदिया :–** मक्षेत्रात सामान्य नागरिकांच्या वैयक्तिक समस्या वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. कुणाला घरकुल योजनेचा लाभ मिळत नाही, कुणी संजय गांधी, श्रावणबाळ, लाडली योजनेपासून वंचित आहे. कुणाची शेतीविषयक समस्या आहे तर कुणाला धान्य वितरणाची. कुणी आरोग्य समस्यांनी त्रस्त आहे, तर कुणाला आधारकार्ड अपडेट झाले नाही. कुणाला जन्ममृत्यू दाखले मिळत नाहीत तर कुणाला वीज कनेक्शन हवे आहे, कुणाला पुरेशी वीजपुरवठ्याची सुविधा. ग्रामविकासाच्या विविध समस्या सोडवून रोजगार उपलब्ध व्हावा हाच लोकांचा मुख्य प्रश्न आहे.फमआमचे प्रयत्न असे आहेत की शासनासोबत समन्वय साधून प्रलंबित प्रकरणांची शून्य प्रलंबिता निश्चित करणे व शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देणे हा आमचा संकल्प आहे.

"जनसंवाद" सामान्य नागरिकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी तसेच शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा या उद्देशाने आमदार विनोद अग्रवाल यांनी आज (ता. २९) ग्राम चुलोद व ग्राम आसोली येथून आमदार आपल्या दारी जनसंवादफ अभियानाची सुरुवात केली.

यावेळी ते मार्गदर्शन करतांना बोलत होते. अभियानांतर्गत गटविकास अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, जलसंधारण विभाग, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामसेवक, पटवारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच तसेच इतर शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान आमदार यांनी जनसंवादातून तक्रारी स्वीकारून त्यांचा त्वरित निपटारा करण्याकडे आमचा भर असेल. हे अभियान दीड ते दोन महिने राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

या जनसंवाद अभियानात आमदार विनोद अग्रवाल, प्रांताधिकारी चंद्रभान खंडाईत, गटविकास अधिकारी श्री. पिंगळे, तहसीलदार शमशेर पठाण, नायब तहसीलदार श्रीकांत कांबळे, भूमिअभिलेख अधिकारी अजय क्षीरसागर, पंचायत समिती सदस्य कनीराम तावडे, चुलोद सरपंच मायाबाई बोरकर, टेमनी सरपंच योगेश पटले, उपसरपंच लतीश बिसेन, एपीएमसी संचालक राधाकृष्ण ठाकुर, ग्रामसेवक दिलीप सहारे, पटवारी लांजे मॅडम, पोलीस पाटील कविता भालाधारे, विजय ठाकुर यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश-जिल्हाधिकारी नायर



**गोंदिया :–** राज्यात अनेक ठिकाणी अवैध गर्भलिंग निदान व गर्भपाताच्या घटना घडत असून यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वेळोवेळी धडक मोहिम राबविली जाते. गोंदिया जिल्हयातही अशा प्रकारच्या अवैध गर्भलिंग तपासणी आढळल्यास कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

प्रसुती पुर्व गर्भलिंग निदान तंत्र कायदा १९९४ अन्वये पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

सभेला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम कटरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, कायदेशीर सल्लागार अॅड. बिना बाजपेई, पीसीपीएनडीटी विधी समुपदेशक अॅड. रेखा सपाटे, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ राऊत उपस्थित होते.

झालेल्या सभेमध्ये एकूण तीन प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यामध्ये जयपुरीया नर्सिंग होम गोंदिया यांचा नविन सोनोग्राफी केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव होता. तर दुसरा प्रस्ताव हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया यांचा परवाना नुतनीकरणाचा होता, तर तिसरा प्रस्ताव आशिर्वाद हॉस्पीटल गोंदिया यांचा परवाना नुतनीकरणाचा होता. यावेळी या तिन्ही प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.

प्रसुतीपूर्व निदान तंत्राचा वापर करुन बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान व गर्भपात करणे शिक्षापात्र गुन्हा आहे. यावर आळा घालण्यासाठी माहिती देणाऱ्यास एक लाख रुपये बक्षिस देण्यात येणार आहे. त्यासाठी टोल फ्री क्रमांक १०४/ १८००२३३४४७५, तसेच www.amchimulgimaha.in या संकेतस्थळावर अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अखेर 'तो' बिबट जेरबंद



**गोंदिया:–** गोठणगाव वनपरिक्षेत्रांतर्गत संजयनगर येथे बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. नागरिकांनी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर आपला रोष व्यक्त करीत हल्लेखोर वाघाला जेरबंद करण्याची मागणी केली होती. त्याला जेरबंद करण्यासाठी गत ३ दिवसांपासून वनविभागाचे कर्मचारी शर्थीचे प्रयत्न करीत होते. त्यांना रविवारी (दि. २८) दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास यश मिळाले असून अखेर वनविभागाचे पथक आणि नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील संजयनगर बंगाली कॅम्प येथे पहाटे ५.३० वाजेदरम्यान घराच्या पडवीत लघुशंका करीत असलेल्या अंश प्रकाश मंडल (५) या चिमुकल्यावर बिबट्याने झडप घालून काही अंतरावर फरफटत नेत जीव घेतला. परिसरात बातमी पसरताच जनतेच्या

संतापाचा उद्रेक वाढला. त्यामुळे चक्काजाम आंदोलन करून तर वनकर्माचाऱ्यांच्या गाडीची तोडफफोड करून नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला होता. मात्र ३ मुलांना गंभीर जखमी करून चौथ्या मुलाचा बळी घेणारा हा बिबट तोच आहे का? याबाबत ग्रामस्थांच्या मनात शंका आहे. त्यामुळे प्रशासनाने बिबट्याची लाळ तपासून खात्री करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली.

वनविभागाच्यावतीने गत ३ दिवसांपासून शोधमोहीम जारी केली होती. वि घटनेच्या ठिकाणी व परिसरात पिंजरा ध लावला होता. अखेर रविवारी दुपारी अ भक्षाच्या शोधात पिंजरा लावलेल्या नि ठिकाणी बिबट आला. पिंजऱ्यातील ग कोंबडीचा फडशा पाडताच पिंजऱ्याचा त्व दरवाजा बंद होऊन तो जेरबंद झाला.

**परिसरात लावलेले पिंजरे आणि कॅमेऱ्यात वेळोवेळी टिपलेल्या दृश्यानुसार खात्रीने तोच बिबट असल्याचे निदर्शनास येत आहे. तरीही याबाबत फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट बघितला जाईल. सर्वप्रथम हल्लेखोर बिबट्याला जेरबंद करण्याची प्राथमिकता होती, आता याप्रकरणी ज्या–ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केला त्यांच्यावर चौकशीअंती निलंबनाची कारवाई िकरण्यात येईल.**

**– पवनकुमार जोंग, उपवनसंरक्षक,वनविभाग गोंदिया**

## अतिवृष्टी, पूरस्थितीमुळे बारावी परीक्षा अर्ज भरण्यास २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई :–** राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास अडचण येत असल्याने त्याला दि. २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले होते.

राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी–विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची उद्या दि. ३० सप्टेंबर रोजी शेवटची मुदत आहे. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टिमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांना संपर्क करून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शिक्षण मंत्री श्री. भुसे यांना बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत निर्णय घेण्यास सांगितले. शिक्षण मंत्र्यांनी लगेचच राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क केला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देशही दिले. त्यानुसार शिक्षण विभागामाफ ॅत २० ऑक्टोबर पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला.

यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया करण्यात आली. त्याचबरोबर बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे तसेच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.

## "अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२५'साठी आवाहन

**गोंदिया :–** केंद्र शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला आहे. या अभिमानास्पद क्षणाचा उत्सव म्हणून महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबर हा दिवस ङ्गअभिजात मराठी भाषा दिवसफ म्हणून तसेच दिनांक ०३ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर या कालावधीत ङ्गअभिजात मराठी भाषा सप्ताहफ म्हणून घोषित केला आहे.

या निमित्ताने जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गोंदिया जिल्ह्यातील शासन–प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, साहित्यिक आणि नागरिकांना विशेष मंच उपलब्ध करून देण्यात येत आहे. स्वलिखित असलेली मराठी भाषेतील कविता ऑनलाईन सादर करण्यात यावी. अभिजात मराठी भाषेला वंदन करण्याची ही एक संधी आहे. या उपक्रमास अधिकाधिक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे यांनी केले आहे.

## विदर्भवाद्यांद्वारे नागपूर कराराची होळी




**गोंदिया :–** स्वतंत्र विदर्भ राज्याच्या याचे मागणीसाठी मागील कित्येक वर्षांपासून चळवळ सुरू आहे. परंतु, शासन मात्र विदर्भाच्या तोंडाला नेहमी पाने पुसल्या गेली. कारण म्हणजे, भारतात अनादीकाळापासून विदर्भ हा एकमेव शिलकी महसूल असलेला प्रदेश आहे. विदर्भवेगळा झाला तर, याला जोडलेली राज्य अथवा प्रदेश अधोगतीला जातील, त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी पृथक विदर्भ राज्याच्या मागणीला खिंडारं पाडली. नागपूर कराराच्या माध्यमातून विदर्भाला वेठीस धरण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले. यामुळे विदर्भवाद्यांव्दारे आज, २८ सप्टेंबर रोजी नागपूर कराराची होळी करून रोष व्यक्त करण्यात आला.

स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करून सत्ताधारी विदर्भातील जनतेचे शोषण करीत आहेत. मागील कित्येक वर्षांपासून स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी लढा सुरू आहे. मात्र सत्ताधारी चळवळीला खिंडार पाडून विदर्भाच्या आंदोलनाला कमकुवत करण्याचे षडयंत्र रचत आले आहेत. सत्ताधाऱ्यांना या प्रदेशातील विपुल साधन संपत्तीचे शोषण करायचे होते, त्यांनी विविध करारांच्या माध्यमातून विदर्भाला वेठीस धरले. त्यापैकी एक करार, ज्याने विदर्भाला अक्षरशः गुलामीत ढकलले, तो म्हणजे २८ सप्टेंबर १९५३ रोजी केलेला नागपूर करार. या कराराची आज (ता. २८) गोंदिया जिल्ह्यातील विदर्भवाद्यांद्वारे होळी केली.

याप्रसंगी विदर्भ राज्य आंदोलन समितीचे कोर कमेटी सदस्य छैलबिहारी अग्रवाल, जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, जिल्हाध्यक्ष वसंत गवळी, सी पी बिसेन, रवि भांडारकर, उपाध्यक्ष भोजराज ठाकरे आदी अन्य कार्यकर्ते उपस्थित राहून विदर्भ वेगळा झालाच पाहिजे मचे नारे लावले. नागपूर करारातील तरतुदी कागदावर प्रथमदर्शनी विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी केल्या गेल्याचा भास निर्माण करतात. मात्र पश्चिम महाराष्ट्र व मुंबईच्या सत्ताधाऱ्यांनी याचा एक छद्मी प्रलेख म्हणून बेमालून वापर केला आहे.

या कराराच्या वेळी विदर्भाची लोकसंख्या २३ टक्के होती. त्या प्रमाणात उद्योग, नोकऱ्या, विविध क्षेत्रातील विकास, एक अधिवेशन आणि सरकारी कारभार नागपुरातून होईल, अशा अनेक तरतुदी असताना, त्याची अंमलबजावणी मात्र कधीच झाली नाही. अशा दुर्लक्षामुळे आता महाराष्ट्रातून वेगळा झाल्याशिवाय विदर्भाचा विकास संभव नाही, असे मनोगत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## राकाँ शरद पवार गटाची आढावा बैठक



**तिरोडा :–**आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची बैठक शनिवारी (दि. २७) स्थानिक जनसंपर्क कार्यालयात रविकांत बोपचे यांच्या अध्यक्षतेत पार पडली.

या बैठकीत निवडणुकी संदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्ष संघटन बळकटीकरण, उमेदवार निवड प्रक्रियेतील निकष, स्थानिक प्रश्नांवर निवडणूक लढविण्याची रणनीती आदी मुद्द्यांवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले. बैठकीत पक्षाच्या पुरोगामी विचारांवर व युवा नेते रविकांत बोपचे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शहरातील अनेक महिला, तरुण व पुरुषांनी जाहीर प्रवेश केला.

गटात प्रवेश केल्याबद्दल प्रवेशितांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रदेश सरचिटणीस मेघा बिसेन, कार्याध्यक्ष नासिर घाणीवाला, शहराध्यक्ष आशिष येरपुडे, अनुसूचित जमाती सेल जिल्हाध्यक्ष संजय धुर्वे, जॉनी सैय्यद, सरपंच छाया टेकाम, सरपंच मंदा टेंभरे, सरपंच रंजित वालदे, विजय बुद्धे, मंगेश गेडाम, संजय टेंभरे, राजेश तांडेकर, रिता नारनवरे, महेश कुकडे, किशोर कुंभरे, नरेश जागंळे, निरज गजभिये आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ मतदार यादी नव्याने तयार करण्याच्या कार्यक्रमास पदवीधर मतदारांनी सहभाग नोंदवावा



**गोंदिया :–** भारत निवडणूक आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत ना–गपूर विभागातील पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला असून यामध्ये पदवीधर मतदारांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात नागपूर विभाग पद–वीधर मतदारसंघ मतदार यादी नव्याने तयार करण्याबाबत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी मानसी पाटील उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी श्री. नायर यांनी सांगितले, भारत निवडणूक आयोगाचे १२ सप्टेंबर २०२५ चे पत्रान्वये १ नाव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या गोंदिया जिल्हा नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या याद्या नव्याने तयार करण्याबाबतचा कार्यक्रम जाहीर झाला असून मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (३) अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक मंगळवार ३० सप्टेंबर २०२५. मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची प्रथम पुनप्रसिध्दी बुधवार १५ ऑक्टोंबर २०२५. मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुनप्रसिध्दी शनिवार २५ ऑक्टोंबर २०२५. नमुना १८ किंवा १९ द्वारे दावे स्विकारण्याचा अंतिम दिनांक गुरुवार ६ नोव्हेंबर २०२५. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई गुरुवार २० नोव्हेंबर २०२५. मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५ ते बुधवार १० डिसेंबर २०२५. गुरुवार २५ डिसेंबर २०२५ रोजी दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे. मंगळवार ३० डिसेंबर २०२५ रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणे असा तपशिल आहे असे त्यांनी सांगितले.

सदर मतदार नोंदणी कार्यक्रमासाठी विभागीय आयुक्त नागपूर हे मतदार नोंदणी अधिकारी असून जिल्हाधिकारी गोंदिया हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे तहसिलदार/खंड विकास अधिकारी (गोंदिया, गोरेगाव, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, आमगाव) हे पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहेत. त्यांचेकडे नमुना १८ मधील अर्ज सादर करता येईल.

मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१ (३) नुसार मतदार नोंदणी अधिकाऱ्यांपैकी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी नागपूर पदवीधर मतदार संघाचे यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने मतदार नोंदणी अधिनियम १९६०

### जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचे आवाहन
### गोंदिया जिल्हा नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या याद्या नव्याने तयार करण्याबाबतचा कार्यक्रम जाहीर

नुसार नमुना १८ मध्ये संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी पाठवावा किंवा पोहचवावा.

पदवीधर मतदार संघाची मतदार यादी प्रत्येक निवडणुकीपूर्वी नव्याने तयार करणे आवश्यक असल्यामुळे या मतदार संघातील सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीत ज्या व्यक्तींची नावे समाविष्ट आहेत अशा सर्व व्यक्तींनी सुध्दा विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करावा.

**पदवीधर मतदार संघासाठीची अर्हता**

जो व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि १ नोव्हेंबर २०२५ पूर्वी किमान ३ वर्ष भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठाची एकतर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समतुल्य असलेली अर्हता धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहे. ३ वर्षाचा कालावधी हा ज्या दिनांकास अर्हता पदवी परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला असेल आणि तो विद्यापिठ किंवा अन्य संबंधित प्राधिकरण यांच्याकडून प्रसिध्द करण्यात आला असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

अर्जदाराने अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेल्या आणि अतिरीक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने यथोचितरित्या अधिप्रमाणित केलेल्या त्यांच्या पदवी गुणपत्रिका याची प्रत, सोबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अर्जदाराने अर्जासोबत पासपोर्ट फोटो लावणे आवश्यक आहे. अर्जदाराने अर्जासोबत आधार कार्ड निवडणूकीचे ओळखपत्र व प्रमाणित छायाचित्र ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. शासकीय कर्मचारी असल्यास नमुना सी मध्ये सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

भारत निवडणुक आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासन, विधी व न्याय मंत्रालयाच्या अधिसूचना १७ जून २०२२ अन्वये पदवीधर मतदार संघाच्या मतदारयादीत नाव नोंदविण्यासाठीच्या अर्जाचा अनुक्रमे नमुना क्र. १८ यामध्ये सुधारणा केलेल्या असून सदर सुधारणा १ ऑगस्ट २०२२ पासून लागू आहेत. तसेच सदर नमुना क्र.१८ अर्जात आधार क्रम ांकासाठी रकाना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तथापि, आधार क्रमांक सादर करणे हे मतदारांच्या वतीने ऐच्छिक आहे आणि मतदाराने अर्जात आधार क्रमांक नमूद केलेला नाही या कारणास्तव अर्ज नाकारु नये, असेही आयोगाने स्पष्ट केलेले आहे.

# खरबंदा जलाशयाचा कालवा गेला वाहून

**गोंदिया :–** मागील काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढल्याने जिल्ह्यात अतोनात नुकसान सुरू आहे. अश–तच काल, २७ सप्टेंबर रोजी आलेल्या मुसळधार पावस–ाने खळबंदा जलाशयाचा एक कालवा जो सेजगाव, परसवाडा, अर्जुनीला जातो. तो फुटल्याने ऐन हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

सविस्तर असे की, गोंदिया तालुक्यातील गंगाझरी पोलिस ठाण्यातंर्गत खळबंदा जलाशय येतो. या जलाशयातून जवळप–ास ५० ते ६० गावांना सिंचनाची सोय खरीप व रब्बी हंगामात हो–ते. सततच्या पावसाने जलाशय तुडूंब भरला आहे. त्यातच तल–ावाचे पाझर पाणी कालव्याच्या माध्यमातून वाहत आहे. अश–तच मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने जमिन दलदल झाली असून त्याचा फटका आता जाणवू लागला आहे. खळबंदा जलाशयाच्या माध्यमातून सेजगाव, अर्जुनी, परसवाडा तसेच परिसरातील गावांना पाणी जातो, तो कालवा सेजगाव ते खळबंदाच्या मधातून फुटला. हा कालवा फुटल्याने व सध्या पाऊस सुरू असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणारच आहे. तर दुसरीकडे जोपर्यत हा कालवा दुरूस्त होणार नाही, तोपर्यत शेतकऱ्यांना पुढील सिंचनासाठी तत्काळत बसावे लागणार आहे. एंकदरीत या पावसाचे पडसाद आता जिल्ह्यातही उमटू लागल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी केली जात आहे.



### संबधित विभागाचे दुर्लक्ष

**खळबंदा जलाशयाची डागडुजी व देखभाल दुरूस्ती ज्या विभागाच्या खांद्यावर आहे. त्या विभागातील अधिकारी व कर्मचा?यांच्या दुर्लक्षाम ुळेच हा प्रकार घडल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतक?यांकडून व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, पाणी आकारणी कर व इतर बाबींसाठी विभागाचे कर्मचारी व अधिकारी शेतक?यांना त्रास देतात. मात्र झालेला प्रकार हा विभागाचा नाकर्तेपणा असल्याचे उघड झाले आहे.**

## झोपेत असलेल्या महिलेवर वाघाचा हल्ला

**देवरी: –** तालुक्यातील धमदीटोला येथे झोपेत असलेल्या एका महिलेवर वाघाने हल्लाबोल करून तिचा फडसा पाडला. चक्क ब्लॅकेट, मच्छरदाणीसह ओढत नेवून तिच्या शरीराचे लचके तोडले. २८ सप्टेंबरच्या मध्यरात्री ही घटना उजेडात येताच परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रभाबाई शंकर कोराम (वय ४९, रा. आलेवाडा ता. देवरी) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेने परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली असून वनविभागाच्या कर्तव्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

माहितीनुसार, प्रभाबाई कोराम ही मागील एक महिन्यापासून मुलीच्या बाळंतपणा करिता पाहुणी म्हणून धमदीटोला येथे आली होती. सर्व काही सुरळीत चालू असताना, काल रात्री कुटुंबातील सर्वजण जेवण करून झोपी गेले होते. अंदाजे १.०० वाजे दरम्यान, प्रभाबाई ही खाटेवर झोपली होती. ही रात्र तिची शेवटची ठरली. झोपेत असताना वाघाने प्रभाबाईवर हल्ला करीत तिला फरफटत नेऊन ठार केले. सदर बाब घरातील सदस्यांना सकाळी माहिती होताच, आरडाओरड केल्याने घटनास्थळी गावकरी जमा झाले.

घटनेची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पसरताच एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती वन अधिकारी तसेच पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली. अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मानव–प्राणी संघर्ष पेटला आहे. वन्यप्राण्यांचे सतत हल्ले वाढले असून जीवहानीला समोर जावे लागत आहे.

# आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहचवा-जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे



**गोरेगाव:–** प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सेवा शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. अशा शिबिरांद्वारे ग्रामीण भागात आरोग्य जनजागृती वाढते आणि तत्काळ वैद्यकीय सेवा मिळते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती सुरेश हर्षे यांनी केले. कार्यक्रमात अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर होते. प्रमुख अतिथी ग्रामीण भागात आरोग्य सेवा मिळण्याचा उद्देश म्हणून चित्रलेखा चौधरी, सुप्रिया गणवीर, शितल बोसेन, अरविंद वाघमारे, विनोद चव्हाण, आखाडे, विमल राऊत आणि विविध ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोरेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, कुराडी येथे मस्वस्थ नारी सशक्त परिवार उपक्रमांतर्गत आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात तब्बल ५२० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये ३९६ महिला व १२४ पुरुष रुग्णांचा समावेश होता. ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत व सुलभ आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक डॉ. विनोद चव्हाण यांनी केले. संचालन अजय कोठेवार यांनी तर आभार रविशंकर कटरे यांनी मानले. तपासणीनंतर सर्व रुग्णांना मोफत औषध वाटप करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आरोग्य सेवक, सेविका, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत पदाधिकारी व स्वयंसेवी संस्थांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरामुळे कुराडी व परिसरातील नागरिकांना एकाच ठिकाणी विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, उपचार व मार्गदर्शन मिळाले. ग्रामस्थांनी उपक्रमाचे कौतुक केले असून, अशा शिबिरांची सातत्याने गरज व्यक्त केली आहे.

# सुभाष गार्डन, आता नवीन स्वरूपात सामान्य नागरिकांना समर्पित..
### शहरात असेच आणखी उद्यान उभारण्याचा संकल्प



**गोंदिया:–**शहरातील अनेक वर्षे जुने आणि एकमेव सुभाष गार्डन हे १ वर्ष चाललेल्या आधुनिक, सुसज्ज नूतनीकरण कार्यानंतर आता सामान्य नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. या गार्डनमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण करून या उद्यानाला नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान असे नाव देण्यात आले.

२५ सप्टेंबर रोजी गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते, नागरिकांच्या उपस्थितीत या उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर आमदार अग्रवाल म्हणाले की, हे नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान आता नवीन स्वरूप, नवी ओळख यांसह नागरिकांना समर्पित आहे. लक्षात घेण्यासारखे म्हणजे, सुभाष उद्यान हे अनेक वर्षे जुने आणि शहरातील एकमेव उद्यान होते, जिथे समस्या प्रचंड होत्या. अपुऱ्या सोयीसुविधांमुळे या उद्यानाची शोभा हरवत चालली होती. आमदार विनोद अग्रवाल यांनी या शहराची ओळख सुसज्ज आणि आधुनिक करण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन गोंदियावासियांना नूतनीकरणाचे वचन दिले होते. आज एक वर्षानंतर हे नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान नागरिकांना समर्पित झाले आहे.

या उद्यानामध्ये शुद्ध आरओ पिण्याचे पाणी, महिला–पुरुषांसाठी शौचालय, ज्येष्ठांसाठी बसण्याची व्यवस्था, जुन्या शिवमंदिराचे नूतनीकरण, योगा कक्ष, लहान मुलांसाठी झुले, स्लाइड, खेळाचे म ैदान, महिलांसाठी विशेष व्यवस्था, बॅडमिंटन कोर्ट, चेस टेबल, मॉर्निंग वॉक ट्रॅक, ग्रीन जिम, ठिकठिकाणी आकर्षक प्राण्यांची कलाकृती, कृत्रिम प्राणी, कारंजे, ७५ प्रकारच्या ३० हजार नवीन रोपांची लागवड, रात्री उद्यान अधिक सुंदर करण्यासाठी दीडशेहून अधिक दिवे, स्पर्धा कक्ष, बैठक कक्ष, वाचनालय अशा अनेक सोयीसुविधांनी ते सुसज्ज करण्यात आले असून पर्यावरणपूरक स्वरूप देण्यात आले आहे, ज्यामुळे उद्यानाच्या सौंदर्यात अधिक भर पडली आहे.

आगामी काही महिन्यांत या उद्यानात दुसऱ्या टप्प्यात पार्किंगची सोय सुरू करण्यात येईल, ज्यामुळे येणाऱ्या वाहनचालकांना सुविधा मिळेल. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, माझा संकल्प आहे की शहरातील इतर भागात देखील अशीच उद्याने उभारली जावीत यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत. शहराला सुंदर बनवण्याबरोबरच नागरिकांना उत्तम व निरोगी आरोग्य कसे देता येईल यावर काम करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.

# गाव संवाद दौऱ्यातंर्गत आमदार बडोलेंनी साधला नागरिकांशी थेट संवाद

**सडक अर्जुनी:–** अर्जुनी–मोरगाव विधानसभा क्षेत्रातंर्गत येत असलेल्या सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी, मुंडीपार/ईश्वर,घटेगाव,गोंगले व पांढरी या ग्रामपंचायतींमध्ये गाव संवाद दौऱ्यातंर्गत आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधत स्थानिक प्रश्न, विकासकामांच्या गरजा आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा केली. नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी प्रतिपादन करताना आमदार बडोले म्हणाले की, जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशास–नाशी समन्वय साधणे हेच गाव संवाद दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.




प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मी कटिबद्ध असून, नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील असे म्हणाले.

कार्यक्रमास पंचायत समिती सभापती चेतन वळगाये, उपविभागीय अधिकारी वरूनकुम ार शहारे, प्र.तहसीलदार प्रेरणा कटरे, जिल्हा परिषद सदस्या सुधा रहांगडाले, पंचायत समिती उपसभापती निशा काशीवार, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती डॉ. अविनाश काशीवार, माजी सभापती संगीता खोब्रागडे, कृ.ऊ.बा.स उपसभापती विश्वनाथ रहांगडाले, माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश चूऱ्हे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक डी.यु. रहांगडाले, गौरेश बावनकर, विनोद काशीवार, तालुका कृषी अधिकारी लांजेवार, उपविभागीय अभियंता सा.बां. किशोर बनस–ोड, उपविभागीय अभियंता महावितरण रेवतकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी अडसूळ यांच्यासह अधिकारी, स्थानिक सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंचनामे करून मदत द्या-गंगाधर परशुरामकर

**सडक अर्जुनी :–** कृषी विभागाचे आकडेवारी नुसार जिल्ह्यात सुमारे दोन लाख हेक्टर वर या हंगामात धानाचे पीक घेतले जाते शेतकरी या साठी मोठया प्रमाणावर हायब्रीड धाणा चे वान वापरतात त्याची



किमत ही खूप जास्त असते एव्हढेच नाही तर यातील बहुतेक जमिनी या कोरडवाहू आहेतब पण शेतकरी बांधवानी विंधन विहरी खोदून इलेक्ट्रिक कनेक्शन घेवून सिंचनाची सुविधा निर्माण केली आहे. पण शेतकरी पुढील पिक घेणे सोईचे व्हावे म्हणून लवकर निघणारा वान जास्त वापरतात व तोच धान आता कापणी साठी आलेला आहे. शेतकरी बांधवानी जास्त उत्पादन येण्याचे हेतूने महागडी खते कीटनाशके याचा वापरही मोठया प्रमाणावर केला आहे. त्यामूळे शेतकरी बांधवांनी घरी होतें नव्हते ते सर्व विकून किंवा कर्ज घेवून शेती केली आहे

व आता पीक हातात यावे एव्हढ्यात मान्सून चे परतीचे पाऊसाने शेतकरी बांधवांचे कंबरडेच मोडले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत. या गंभीर समस्या कधी तात्काळ लक्ष देऊन झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.

# पंचायतराज योजनेतून गावाचा सर्वांगीण विकास साधला जाणार

**नवेगावबांध :–** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून गावागावांमध्ये विकासाची भावना निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील शेवटच्या घटकातील माणूस गावाच्या विकास प्रक्रियेशी थेट जोडला जाणार. या अभियानाच्या माध्यमातून स्थानिक जनतेला रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. सेवा पंधरवड्याअंतर्गत गावातील प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येतील. एकट्या सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत सदस्य यांचे एकट्या दुकट्याचे काम नसून सर्व बोरटोला ग्रामवासीयांच्या सहभागातून गावा–चा सर्वांगीण विकास सहज साधला




जाणार असल्याचे प्रतिपादन जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा व स्वच्छता सेवा २०२५ ग्रामपंचायत बोरटोला येथे शुक्रवारी (दि. २६) मस्वच्छता ही सेवा महाश्रमदानफउपक्रमांतर्गत 'एक दिवस, एक तास, एक साथ' ही मोहीम राबविण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच कुरुंदा वैद्य होत्या. पाह–ुणे म्हणून उपसरपंच काशीनाथ कापसे, पोलिस पाटील संगीता भेंडारकर, इंजोरीचे डाकराम मेंढे, तंमुस अध्यक्ष लक्ष्मण येरणे, माजी सरपंच रवींद्र खोटेले, ग्रामपंचायत सदस्य गीता नारनवरे, राज–कुमार मेंढे, भारती डोये, सुरेखा ब्राह्मणकर, वन समितीचे अध्यक्ष सतीश शिवणकर, पत्रकार संजीव बडोले, मुख्याध्यापक वाल्मीक मेश्राम, पात्रीकर ग्राम महसूल अधिकारी मुसुद्दीवार, ग्रामपंचायत अधिकारी रजनी शहारे, अंगणवाडी सेविका छबिला शेंडे, ज्योती मेंढे उपस्थित होते. सार्वजनिक स्वच्छता उपक्रमांतर्गत झालेल्या ग्राम स्वच्छता अभियानात जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी गावकऱ्यांसह सहभागी होऊन स्वच्छता अभियानाचा शुभारंभ केला. कार्यक्रमाचे सतीश शिवणकर यांनी संचालन केले तर उपस्थितांचे ज्योती मेंढे यांनी आभार मानले.

# माओवादी नेता भूपतीच्या भूमिकेवर पाच राज्यांचे लक्ष

**गोंदिया:–** माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने संघटनेत सर्वोच्च नेतृत्वात दुसऱ्या स्थानी असलेल्या भूपतीकडून शस्त्रे काढून घेण्याचे आदेश दिले. यावर भूपतीची नेमकी भूमिका काय याकडे दंडकारण्याचे लक्ष लागून आहे. तर दुसरीकडे मागील ४५ वर्षांपासून संघटनेत कार्यरत असलेला माओवाद्यांचा हा नेता नेमका कुठे आहे, त्याच्यासोबत संघटनेतील किती सहकारी आहेत याविषयीचा शोध महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगण, ओडिशा आणि आंध्र प्रदेशातील सुरक्षा यंत्रणांकडून घेतला जात आहे.

पीपल्स वॉर ग्रुप या माओव–ादी संघटनेची स्थापना कोंडापल्ली सीतारामय्यानी १९७५च्या सुमारास केली. या काळात त्याच्या विचारधारेकडे आकर्षित होऊन तत्कालीन आंध्र प्रदेशच्या उस्मानिया आणि काकतिया विद्यापीठातून पदवीधर झा–लेले अनेक युवक आकर्षित झाले. महाराष्ट्राच्या सीमेपासून शंभर किलोमीटर अंतरावरील पैदापल्ली येथील स्वातंत्र्यसंग्राम सैनिक असलेल्या एका शिक्षकाच्या घरात जन्मलेले मल्लोजुला कोटेश्वरराव उर्फ किशनजी आणि त्याचा लहान भाऊ वेणुगोपाल उर्फ भूपती हे दोघे शिक्षण पूर्ण केल्यानंतर या संघटनेत सामील झाले. नक्षल्यांच्या तत्कालीन नेत्यांनी या दोघांना तत्कालीन चंद्रपूर आणि सध्याच्या गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात पाठविले. भूपतीच्या मार्गदर्शनात १९८२मध्ये सिरोंचा दलम आणि अहेरी दलमची उभारणी करण्यात आली.

पेरमिली आणि एटापल्ली दलम ही उभे राहिले. या सर्व दलमचा मुख्य मार्गदर्शक म्हणून भूपती काम



करीत होता. १९८४मध्ये कमला–पुरात माओवाद्यांचे मोठे अधिवेशन झाले होते.

या अधिवेशनाचे संपूर्ण नियोजन भूपतीच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याच काळात भूपतीला राज्य राखीव दलाचे जवान आणि आंध्र प्रदेश पोलिस यांनी संयुक्तपणे अटक करून सिरोंचाला आणले होते. नंतर भूपतीला चंद्रपूरच्या न्यायालयात

### युद्धबंदीच्या प्रस्तावाने कोंडी

**अलीकडेच भूपतीने माओवादी संघटना युद्धबंदी करीत असल्याचे सांगत शांतता चर्चेसाठी सरकारसमोर पत्रकातून प्रस्ताव ठेवला होता. एक महिन्याची मुदत मागत भविष्यात संघटना शस्त्र सोडणार असल्याचे संकेतही भूपतीने दिले होते. तीन दिवसांपूर्वी माओवाद्यांच्या तेलंगण राज्य समितीने हा संघटनेचा निर्णय नाही तर भूपतीचा वैयक्तिक असल्याचे सांगत त्याची कोंडी केली होती. हे पत्रक काढणारा जहाल माओवादी विकल्प हा महाराष्ट्र–छत्तीसगड सीमेवर सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत दोन दिवसांपूर्वी ठार झाला होता. या घडामोडीवर भूपतीची नेमकी भूमिका काय आहे याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला जात आहे.**

हजर करण्यात आले. पुढे त्याची सुटका झाली.

सुटकेनंतर भूपतीने नागपूर, ठाणे, मुंबई, भिवंडी या परिसरात कामगारांच्या वस्त्यांमध्ये जाऊन नक्षल विचारधारेचा प्रचार केला. यानंतर तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय झाला. अहेरी दलममध्ये काम करणाऱ्या तारक्कासोबत १९८५मध्ये भूपतीने लग्न केले. गडचिरोली जिल्ह्यात माओवादी संघटना मजबूत करण्यासाठी १९९७पर्यंत सक्रिय असलेला भूपती नंतर दंडकारण्यात सक्रिय झाला. बस्तरमधील अनेक जिल्ह्यांत फिरून त्याने संघटनेच्या प्रचारासाठी प्रयत्न केले. माओवाद्यांच्या दंडकारण्य झोनल समितीचा सदस्य आणि नंतर २००३मध्ये माओवाद्यांचा केंद्रीय समितीचा सदस्य म्हणून भूपतीची निवड करण्यात आली.

# अनधिकृत सात वाहन विक्रेत्यांवर आरटीओची धडक कारवाई

**गोंदिया :–** ग्रामीण भागात वाढलेल्या अनधिकृत वाहन विक्रेत्यांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) गोंदियाने शुक्रवारी (दि.२६) शहरातील विविध सात अनधिकृत विक्रेत्यांवर एकाच वेळी कारवाई केली आहे. सणासुदीच्या काळात करण्यात आलेल्या या कारवाईमुळे बेकायदेशीर विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, अधिकृत डिलर्सनी मात्र या कारवाईचे स्वागत केले आहे.

अनेक अनधिकृत वाहन विक्रेते ग्राहकांची दिशाभूल करून स्वतःला अधिकृत विक्रेता म्हणून सादर करत होते. ते अधिकृत कंपन्यांचे ट्रेडमार्क, लोगो आणि जाहिरातींचा बेकायदेशीरपणे वापर करत होते. अशा विक्रेत्यांकडून वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना वॉरंटी, सर्व्हिस आणि सुट्या भागांच्या संदर्भात मोठ्या अडचणी येत होत्या. हे बेकायदेशीर कृत्य केवळ कायद्याचे उल्लंघनच नाही, तर ग्राहकांची फसवणूक करणारे आणि संबंधित वाहन कंपन्यांच्या विश्वासार्हतेला धक्का देणारे होते. यामुळे अधिकृत डिलर्सनाही मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. यासंदर्भात एका अधिकृत वाहन विक्रेत्याने गोंदिया आरटीओकडे तक्रार केली. त्याच अनुषंगाने संबंधित अनधिकृत विक्रेत्यांना आरटीओने सूचना देखील दिली होती; पण यानंतरही त्यांनी कुठलीच सुधारणा केली नाही. त्यामुळे शुक्रवारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांच्या नेतृत्वात शहरात धडक तपासणी मोहीम राबवून शहरा–तील किया शोरूम, जायका टाटा मोटर्स, आदित्य टाटा मोटर्स, स्कोडा



शोरूम, नेक्सा शोरूम, टोयाटा शोरूम, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा या सात विक्रेत्यांवर विदाऊट ट्रेडअंतर्गत कारवाई करण्यात आली.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांच्या मार्गदर्शनात मोटार वाहन निरीक्षक निशिकांत वैद्य, पांडुरंग आव्हाड, अनिकेत टाकळकर, विनय गांगुर्डे, आनंद मोड, दत्तात्रय गाढवे, विशाल भगत, माणिक कोरे, रितेश चौधरी, केतन बारसागडे, माणिक कोरे, स्वप्नील कुरसंगे, सोनाली डोंगरवार, राहुल सपकाळ, राहुल सपकाळ, अनुप नागदेवे, धनराज पुरी यांनी केली.